**International Journal of Advance and Applied Research**
www.ijaar.co.in
**ISSN – 2347-7075** **Impact Factor – 8.141**
**Peer Reviewed** **Bi-Monthly**
**Vol. 11 No.6** **July-Aug 2024**

# आंतरराष्ट्रीय राजकारण आणि आंतरराष्ट्रीय वित्तपुरवठा संस्था

**डॉ.दीपक सर्जेराव पाटील-शेटके**
विषय - राज्यशास्त्र - आंतरराष्ट्रीय राजकारण, राजाराम महाविद्यालय, कोल्हापुर
**Corresponding Author- डॉ.दीपक सर्जेराव पाटील-शेटके**
**DOI- 10.5281/zenodo.14021111**

**प्रस्तावना:**

आज 21 व्या शतकात जागतिक राजकारणात आंतरराष्ट्रीय व्यापार व वित्त पुरवठा हे घटक निर्णायक ठरत आहेत. विकसित राष्ट्रांचे प्रार्बल्य व वर्चस्व असणारे संस्था व गट जागतिक राजकारणात महत्त्वपूर्ण ठरतात. व्यापार, गुंतवणूक, भांडवल, पर्यटन, रोजगार, उद्योग, परकीय चलन, आयात-निर्यात इ. क्षेत्रात राजकीय अर्थकारण व दबाव गट निर्णायक ठरतात. आज दुसऱ्या महायुद्धानंतर स्थापन झालेल्या अनेक वित्तपुरवठा संस्था या जागतिक राजकारण व राजनयात प्रभाव पाडत आहेत. जगाची विभागणी आज विकसित, विकसनशील व अविकसित अशी झालेली आहे. महासत्ता व सामर्थ्यशाली राष्ट्रे यात वित्तपुरवठा संस्थाचा आपल्या स्वार्थासाठी वापर करतात. आज सुबत्ता, समृद्धी आणि विकास साध्य करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर अर्थसहाय्य व भांडवल लागते. गरीब व मागास राष्ट्रे आजही परावलंबी आहेत. त्यांच्या या परावलंबनाचा प्रगत व वर्चस्ववादी राष्ट्रे फायदा उचलतात. प्रस्तुत शोधनिबंध सद्य:कालीन आंतरराष्ट्रीय राजकारण व वित्तपुरवठा संस्था यांच्यातील सहसंबंधावर प्रकाश टाकणारा आहे. हा शोधनिबंध अर्थकारण व राजकारण यांचा घनिष्ठ संबंध दर्शवतो.

**संशोधन विषय परिचय:**

आंतरराष्ट्रीय राजकारण हे आपल्या दैनंदिन जीवनावर प्रभाव टाकत असते. याच जागतिक घडामोडी व राजकारणातून जगात नवी व्यवस्था अस्तित्वात येते. राजकारण व वित्तपुरवठा या दोन बाबी एकत्रित काम करतात. प्रगत-पुढारलेली राष्ट्रे ही अधिक श्रीमंत व प्रबळ होत असतात व गरीब राष्ट्रे ही दारिद्र्य, बेकारी, निरक्षरता, टंचाई, कुपोषण, भूकबळी या दुष्टचक्रात फसतात. याला अनेक घटक कारणीभूत आहेत. 19 व 20 व्या शतकातील वसाहतवादी-साम्राज्यवादी राष्ट्रे आज नव्या रुपात व माध्यमातून आपला विस्तारवाद राबवत आहेत. आर्थिक, वैज्ञानिक, सांस्कृतिक, व्यापारी, पर्यावरणीय, तांत्रिक, औद्योगिक प्रगती ही वित्तपुरवठा व भांडवल गुंतवणूकीवर अवलंबून असते. हा शोधनिबंध जागतिक राजकारणात निर्णायक भूमिका बजावणाऱ्या मोठ्या वित्तपुरवठा संस्थावर आधारित आहे. ज्या संस्था जागतिक सत्ता संतुलन व समीकरणे घडवतात.

**उद्दिष्ट्ये:**

1. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचा अभ्यास करणे.
2. जागतिक बँक गटाचा अभ्यास करणे.
3. आशियाई विकास बँकेचा अभ्यास करणे.
4. आंतरराष्ट्रीय विकास संघटनेचा अभ्यास करणे.

**गृहितके:**

1. आंतरराष्ट्रीय राजकारणात वित्तपुरवठा संस्थांचा प्रभाव आहे.
2. वित्तपुरवठा संस्था जागतिक राजकारणात कृतिशील आहेत.
3. वित्तपुरवठा संस्था तटस्थ व निष्पक्षपणे काम करू शकत नाहीत.
4. विकसित राष्ट्रे वित्तपुरवठा संस्थांवर वर्चस्व ठेवतात.

**संशोधन विषय मांडणी :**

दुसऱ्या जागतिक महायुद्धामुळे अनेक राष्ट्रांचे व अर्थव्यवस्थांचे अतोनात नुकसान झाले. बहुपक्षीय व्यापार अस्ताव्यस्त झाला होता. त्यामुळे 1945 नंतर जागतिक अर्थव्यवस्थांच्या पुर्नउभारणीसाठी, योजनाबद्ध विकास घडवण्यासाठी नवी विश्वरचना व संस्था निर्माण झाल्या.

1. विनिमय दर स्थैर्य व अल्पकालीन व्यवहार तोल असंतुलन कमी करण्यासाठी मदत.

2. विकासासाठी भांडवल उपलब्धता
3. वस्तू व्यापारातील अडथळे दूर करणे हे प्रश्न सोडविण्यासाठी अनुक्रमे तीन बहुपक्षीय संस्था स्थापन झाल्या.

**आंतरराष्ट्रीय नाणेनिधी :**

22 जुलै 1944 रोजी ब्रेटण वुड परिषदेमधील शिफारशीनुसार 27 डिसेंबर 1945 रोजी IMF ची स्थापना करण्यात आली. तिचे प्रत्यक्ष कार्य 1 मार्च 1947 रोजी सुरू झाले. IMF चे मुख्यालय वॉशिंग्टन येथे आहे. आज जगातील बहुतेक देश IMF चे सदस्य आहेत. सध्या 190 सदस्य आहेत.

IMF ही एक आंतरराष्ट्रीय आर्थिक संस्था असून तिला युनोच्या विशेषीकृत संस्थेचा दर्जा देण्यात आला आहे. या निधीला स्वत:ची सनद, प्रशासकीय संरचना व वित्तपुरवठयाचे स्रोत आहेत. IMF चे वित्तीय वर्ष 1 एप्रिल ते 30 मार्च हे आहे.

**IMF ची वैशिष्ट्ये :**

1. आंतरराष्ट्रीय चलनविषयक सहकार्यास प्रोत्साहन देणे.
2. जागतिक स्तरावर विनिमय दर स्थैर्य राखणे, प्रोत्साहन देणे.
3. चलनविनिमय दर बंधने कमी करणे.
4. आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या संतुलित वाढीला प्रोत्साहन देणे.

**IMF चे संघटन:**

Board of Governors ही निर्णय येणारी सर्वोच्च संस्था आहे. प्रत्येक सदस्य राष्ट्राला यावर सदस्य मिळते. दैनंदिन कामकाजासाठी एक कार्यकरी मंडळ असते.

**IMF च्या भांडवलाचे स्रोत :**

IMF ला भांडवल सदस्य राष्ट्रांकडून प्राप्त होते. प्रत्येक सदस्य राष्ट्राला एकूण भांडवलातील कोटा ठरवून दिला जातो.

**जागतिक बँक गट :**

हा पाच आंतराष्ट्रीय गट आहे. यामध्ये पुढील संस्थांचा समावेश होतो.

1) IBRD 2) IDA 3) IFC 4) MIGA 5) ICSID

जागतिक बँकेची स्थापना 27 डिसेंबर 1945 रोजी करण्यात आली. मुख्यालय वॉशिंग्टन येथे आहे. सध्या 189 सदस्य आहेत. या संस्थेलाही युनोच्या विशेषीकृत संस्थेचा दर्जा आहे. 1 जुलै ते 30 जून हे या संस्थेचे वित्तीय वर्ष आहे. सदस्य राष्ट्रांना विकासासाठी दीर्घकालीन कर्जे देणे, भांडवल व गुंतवणूक करार घडवून आणणे इ. ही संस्था आपल्या निधीची उभारणी जागतिक वित्तीय बाजारातून करते. या संस्थेमार्फत जागतिक विकास अहवाल, व्यवसाय करणे, अहवाली आंतरराष्ट्रीय कर्ज सांख्यिकी हे अहवाल प्रकाशित केले जातात. भारत देश 05 संस्थापैकी 04 संस्थांचा सदस्य आहे.

**आशियायी विकास बँक :**

ही बँक समृद्ध समावेशक, सक्षम आणि शाश्वत आशिया व पॅसिफिक साध्य करण्यासाठी आणि अतिदारिद्र्य निर्मूलनासाठी शाश्वत प्रयत्न करण्याप्रती जबाबदार असलेली संस्था आहे. 19 डिसेंबर 1966 रोजी 31 सदस्य राष्ट्रांनी मनिला (फिलिपाईन्स) येथे आशियाई विकास बँकेची स्थापना केली. ADS ला UNO च्या अधिकृत निरीक्षक दर्जा आहे. सध्या ADB चे 68 सदस्य देश आहेत. मनिला येथे मुख्यालय आहे.

ADB च्या संघटनेत पुढील यंत्रणांचा समावेश होतो. बोर्ड ऑफ गव्हर्नर्स ही सर्वोच्च धोरण निर्धारक यंत्रणा असून त्यामध्ये प्रत्येक सदस्य राष्ट्राचे दोन प्रतिनिधी असतात. त्यानंतर बोर्ड ऑफ डायरेक्टर्स हे 12 संचालकांचे बनलेले असते. कर्जसंमती, बजेट मान्यता, बँक धोरण, कर्जे हमी निर्णय घेणे. ADB चे अध्यक्ष बँक व्यवस्थापनाचे प्रमुख असतात. ADB ही आपल्या सदस्य राष्ट्रांना व भागीदार देशांना सामाजिक व आर्थिक विकासासाठी प्रोत्साहन कर्ज, अनुदान देणे, विविध प्रकल्पांना सहाय्य करणे, पायाभूत सुविधा, आरोग्य, शिक्षण, हवामान बदल, ग्रामविकास, अन्नसुरक्षा, शहर विकास, पर्यावरण, ऊर्जा, पर्यटन, लिंग समानता, वाहतूक या क्षेत्रांचा समावेश होतो.

ADB सार्वजनिक-खाजगी क्षेत्राबरोबर इतर संस्थांसमवेत सहवित्तपुरवठा केला जातो. ADB ची रचना जागतिक बँकेच्या धर्तीवर करण्यात आली. सदस्यांना ADB भांडवलातील अंशदानानुसार त्यांना मताधिकार देण्यात आला आहे. भारत हा ADB चा संस्थापक सदस्य आहे. भारत 1986 पासून ADB करून कर्जे घेतो. भारत ADB चा प्रमुख कर्जदार आहे. ADB चा अग्रक्रम पुढीलप्रमाणे- दारिद्र्य व असमानता, लिंग समानता, हवामान बदल, आपत्ती व्यवस्थापन, पर्यावरण शाश्वती हे आहेत.

**महत्त्व व उपयुक्तता :**

1. आंतराष्ट्रीय राजकारणात कर्जे, अनुदान, अर्थसहाय्य, भांडवल व गुंतवणूक या बाबी खूपच निर्णायक आहेत.

2. आज जगातील राजकारण हे विविध प्रादेशिक गट/कराराबरोबर या वित्त पुरवठा संस्थातून चालते.
3. विकसित देशांचे सामर्थ्य व वर्चस्व या वित्त पुरवठ्यात लपलेले आहे. हा वित्तपुरवठा राजकीय बदल व सत्तांतर घडवतो.
4. आंतरराष्ट्रीय राजकारण हे चलन, व्यापार, व्यवहारतोल, व्यापार-शेष, भांडवल, राखीव निधी, मध्यवर्ती बँका हे घटक सर्वाधिक शक्तिशाली आहेत.
5. मागास व विकसनशील राष्ट्रांमध्ये बहुराष्ट्रीय कंपन्या दबाव व स्वार्थाचे राजकारण करतात.

**गृहितकांची पडताळणी:**

1. आजही आंतरराष्ट्रीय राजकारणात WB, WTO, IMF, ADP, BRICS, IDA या संस्थांचा प्रचंड प्रभाव आहे.
2. जवळपास सर्वत्र वित्तपुरवठा सध्या जागतिक राजकारणात विविध आर्थिक उद्देशातून कार्यरत असतात.
3. वित्तपुरवठा संस्थांची रचना व स्रोत बघता या संस्था पूर्णपणे तटस्थ नसतात.
4. युरोप, अमेरिका, चीन, रशिया, जपान ही राष्ट्रे सर्वच वित्तपुरवठा संस्थांवर वर्चस्व ठेवतात.

**निष्कर्ष:**

1. युरोप, अमेरिका, आशिया, आफ्रिका इ. सर्व देशांत वित्तपुरवठा संस्थांचे जाळे आहे.
2. वित्तपुरवठा हा एखाद्या देशाची प्रगती वा अधोगती निश्चित करतो.
3. सामर्थ्यसंपन्न राष्ट्रे जगामध्ये आपले वर्चस्व टिकविण्यासाठी कोणत्याही कुटील नीतीला स्वीकारतात.
4. गरीब राष्ट्रे परावलंबी व मागास रहावीत असा एक विचारप्रवाह दिसून येतो.
5. भारत ही एक जगाची मोठी बाजारपेठ व गुंतवणूक स्थान आहे.
6. MNC या आधुनिक काळात नवा व्यापारवाद व विस्तारवाद आणत आहेत.
7. क्युबा, व्हेनेझुएला, इराण, मेक्सिको, उ. कोरिया, फिलिपाईन्स, व्हिएतनाम, तैवाण, अफगाण, तुर्कस्थान, पाकिस्तान, सुदान, येमेन या राष्ट्रांवर बरीच वर्षे निरनिराळे निर्बंध आहेत.
8. भांडवल व गुंतवणूकीचा उपयोग राष्ट्राचे सार्वभौमत्व धोक्यात आणणारे नसावे. देशांतर्गत राजकारणात हस्तक्षेप नको.

**शिफारशी:**

1. विकसनशील राष्ट्रांचा सक्षम-समर्थ दबावगट बनायला हवा.
2. विकसित राष्ट्रांची मक्तेदारी कमी व्हायला हवी.
3. BRICS, BIMSTEC, SAARC< ASEAN, SCO, ICO, G-20 या गटांनी आपले स्वतंत्र चलन निर्माण करावे.
4. आंतरराष्ट्रीय राजकारणात विशिष्ट चलनांची मक्तेदारी असता कामा नये.
5. वित्तपुरवठा हा लष्करी, दहशतवादी, युद्ध, हल्ले, शस्त्रे यासाठी होता कामा नये.
6. आंतरराष्ट्रीय राजकारण हे बहुध्रुवीय व सर्वसमावेशक व्हावे. मागास राष्ट्रांचे शोषण थांबावे.

**संदर्भ सूची:**

1. दै.सकाळ, सप्तरंग पुरवणी, ऑगस्ट 2024
2. आंतरराष्ट्रीय राजकारण-वा.दा. रानडे
3. दै.लोकसत्ता विशेषांक, संपादक गिरीष कुबेर
4. प्रा.शुभ्रा रंजन-PSIR व्याख्याने